Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education
S.R.No.832-A, Final Plot No. 178, 179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
स.नं.८३२ए, फायनल प्लॉट नं.१७८, १७९बालचित्रवाणीजवळ, आधारकर रिसर्च इन्स्टिट्युटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर,
पुणे ४११ ००४.

Tel : Chairman(P):STD .(020)-25651751 Secretary(P):25651750&EPABX -25705000& Email : secretary.stateboard@gmail.com

ईमेलव्दारे

क्र.रा.मं./सन २०२३ दुष्काळ ख.हं./ 5053
पुणे ४११ ००४.
दिनांक - १३/११/२०२३
17

प्रति,
विभागीय सचिव
पुणे/नागपूर/छत्रपती संभाजीनगर/मुंबई/कोल्हापूर/
अमरावती/नाशिक/लातूर/कोकण विभागीय मंडळ
पुणे/नागपूर/ छत्रपती संभाजीनगर /मुंबई/कोल्हापूर/
अमरावती/नाशिक/लातूर/रत्नागिरी.

विषय – सन २०२३ च्या खरीप हंगामामध्ये राज्यातील १५ जिल्ह्यातील ४० तालुक्यांमध्ये दुष्काळ घोषित – परिक्षा शुल्क परतावा.

संदर्भ – शासन निर्णय क्र.एससीवाय-२०२३/प्र.क्र.३७/म-७, दि.३१/१०/२०२३

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भीय शासन निर्णय दि.३१/१०/२०२३ अनुसार, सन २०२३ च्या खरीप हंगामामध्ये महाराष्ट्र राज्यातील पुढे नमूद केलेल्या १५ जिल्ह्यातील ४० तालुक्यांमध्ये दुष्काळ घोषित झाला आहे.

| अ.क्र. | विभागीय मंडळ | जिल्हा | तालुका | एकूण तालुके |
|---|---|---|---|---|
| ०१ | पुणे वि.मंडळ | पुणे जिल्हा | पुरंदर सासवड, बारामती, शिरुर घोडनदी, दौंड, इंदापूर | ०५ |
| ०२ | | सोलापूर जिल्हा | बार्शी, माळशिरस,सांगोला, करमाळा,माढा | ०५ |
| ०३ | छत्रपती संभाजीनगर वि.मंडळ | छत्रपती संभाजीनगर | छत्रपती संभाजीनगर, सोयगाव | ०२ |
| ०४ | | बीड जिल्हा | वडवनी, धारुर, अंबेजोगाई | ०३ |
| ०५ | कोल्हापूर वि.मंडळ | कोल्हापूर जिल्हा | हातकणंगले, गडहिंग्लज | ०२ |
| ०६ | | सातारा जिल्हा | वाई,खंडाळा | ०२ |
| ०७ | | सांगली जिल्हा | शिराळा, कडेगांव, खानापूर विटा, मिरज | ०४ |
| ०८ | अमरावती वि. मंडळ | बुलढाणा जिल्हा | बुलढाणा, लोणार | ०२ |
| ०९ | नाशिक वि. मंडळ | नाशिक जिल्हा | मालेगांव, सिन्नर, येवला | ०३ |
| १० | | नंदुरबार जिल्हा | नंदुरबार | ०१ |
| ११ | | धुळे जिल्हा | सिंदखेडा | ०१ |
| १२ | | जळगांव जिल्हा | चाळीसगांव | ०१ |
| १३ | लातूर वि. मंडळ | लातूर जिल्हा | रेणापूर | ०१ |
| १४ | | धाराशिव जिल्हा | वाशी, धाराशिव, लोहारा | ०३ |
| १५ | | जालना जिल्हा | भोकरदन, जालना, बदनापूर, अंबड, मंठा | ०५ |
| | | | एकूण तालुके → | ४० |

मागील पृष्ठावर नमूद केलेल्या १५ जिल्ह्यातील ४० तालुक्यांमधील / कार्यक्षेत्रातील माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षा फेब्रुवारी / मार्च २०२४ साठी प्रविष्ठ होणा-या / झालेल्या परिक्षार्थींना, शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१९/प्र.क्र.४७/एसडी-५, दि.१/८/२०१९ आणि शासन शुध्दीपत्रक क्र.संकीर्ण २०१९/प्र.क्र.४७/एसडी-५, दि.३/२/२०२० अनुसार, "परिक्षा फीच्या रकमेची प्रतिपूर्ती विद्यार्थ्यांच्या / पालकांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये RTGS द्वारे जमा करावयाचे आहे.

मंडळाने परिक्षा आवेदनपत्रामध्ये (online application) माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षार्थींसाठी अ.क्र.२० आणि उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षार्थींसाठी अ.क्र.२२ मध्ये Bank account बाबत सविस्तर माहिती नमूद करणेसाठी रकाने उपलब्ध केले आहे.

परिक्षा आवेदनपत्रामधील सदर माहिती संबंधित विद्यार्थी / पालक / मुख्याध्यापक / माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा / महाविद्यालये यांनी भरणे आवश्यक / बंधनकारक आहे. सबब, याबाबत आपल्या कार्यक्षेत्रातील संबंधित शाळा/महाविद्यालये यांना तातडीने, परिक्षार्थी विद्यार्थ्यांची आवेदनपत्रामधील सदर माहिती नमूद करणेबाबत कळवावे.

(अनुराधा ओक)
सचिव
राज्यमंडळ,पुणे.

पृष्ठांकन क्र. अविमं/माप/उमाप/2186
दिनांक:- -21 /11/2023

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालये
अमरावती विभाग अमरावती.

उपरोक्त पत्राचे अवलोकन करुन त्यानूसार योग्य कार्यवाही करण्यात यावी. व सदर बाब विद्यार्थी,पालक,शिक्षक व इतर संबंधित सर्व घटकाच्या निदर्शनास आणून दयावी.

(निलिमा टाके)
विभागीय सचिव
अमरावती विभागीय मंडळ,अमरावती